# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 07/07/2021 (बुधवार)

(दुपार)

---

### नागपूर ग्रामीण हद्दीतील जबरी चोरी उघड
### एकुण 1,41,500/— रू चा मुद्देमाल जप्त, आरोपी जेरबंद
### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक 02.07.2021 रोजी फिर्यादी बबलु तुलाराम सोनकुसरे रा. रामटेक हा आपली पत्नी व मुलीसह रात्री 10.00 वा. सुमारास नागपूर वरून रामटेकला ॲक्टीव्हा मोपड ने जात असता मौजा वराडा शिवारात बंद टोल नाक्याजवळ मागुन येणाऱ्या काळया रंगाच्या एवेंजर मोटर सायकलवरील इसमाने त्याच्या पत्नीच्या खांदयावरील लेडीज बॅग हिसकावली. त्या बॅगमध्ये नगदी 8,000/— रू, 02 ग्रॅम सोन्याचे मणी, चांदीच्या पायपटया व मोबाईल असा एकुण 28,700/— रू चा माल जबरीने हिसकावुन पळुण गेल्याच्या तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे कलम 392 भादंवि अन्वये गुन्हा नोंद करून गुन्हा तपासात घेण्यात आला. सदर गुन्हयाच्या तपासात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तसेच जिल्हयातील पोलीस स्टेशनला आरोपीबाबत माहिती देण्यात आली असता, दिनांक 06.07.2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखा पथकाला सदर आरोपी हा रामटेक परिसरात फिरत असल्याची माहिती प्राप्त झाल्याने सदरची माहिती पोस्टे रामटेक चे सहा. पोलीस निरीक्षक विवेक सोनवने यांना देण्यात आली असता, त्यांचे सहकारी परि.पोउपनि ओम कारगुलवार व स्टाफ यांनी सदर आरोपी नामे आबीद खान हमीद खान वय 31 वर्षे रा. मदन चौक मच्छीपुल कामठी यास रामटेक येथुन ताब्यात घेवुन आरोपीने गुन्हयात वापरलेली मोटर सायकल तसेच 3,500/— रू नगदी व मोबाईल संच असा एकुण 1,41,500/— रू चा माल जप्त करून आरोपी यास पोस्टे कन्हान यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक अनिल राऊत, सहा.फौजदार लक्ष्मीप्रसाद दुबे, पोलीस हवालदार विनोद काळे, नापोशि शैलेश यादव, अरविंद भगत, सत्यशिल कोठारे, पोलीस शिपाई प्रणय बनाफर, विरेंद्र नरड, चालक सफौ साहेबराव बहाळे तसेच पोस्टे रामटेक येथील सपोनि विवके सोनवने, परि.पोउपनि ओम कारगुलवार व त्यांचे सहकारी यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर